
देश–विदेशातील
लोककथा
मीनाक्षी केतकर
परी प्रकाशन

# देश - विदेशातील लोककथा

©सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

१. जादूचा अंगरखा आणि... .... ३
२. बटाट्या, कवठ्या आणि... .. ९
३. दयाळूपणाचे बक्षीस ........... १५
४. बडबडी बायको ............... २०
५. बर्फातला राजा हिमराज ....... २६
६. सॉलोमनची अंगठी ............ ३१
७. जादूचा आरसा ............... ४०
८. अद्‌भुत फुले .................. ४९
९. उडते जहाज .................. ५९
१०. हंस कन्या .................... ६९
११. काचेचा डोंगर ................ ७८
१२. काळाचे ओझे ................ ८२
१३. गाणारा पक्षी ................. ८७
१४. निळा मोती .................... ९५
१५. लबाड लांडग्याचे ढोंग ......... ९९
१६. उडणारा घोडा ................ १०३
१७. तारुण्याचा झरा .............. १११
१८. सुवर्णपक्षी .................... ११४
१९. धरणीपुत्र आंद्रिया ............ ११८
२०. चित्रकार होकी आणि मांजरे ... १३१
२१. बुद्धूला मिळाली राजकन्या .... १३५
२२. दुर्दैवाचा फेरा ................ १४५
२३. नाताळची भेट ................ १५०
२४. आरशातील आई ............. १५५
२५. बारा भाऊ एक बहीण .......... १५८
२६. वंश कसे निर्माण झाले ........ १६५
२७. फुलराणी ..................... १६८
२८. संपत्तीचा हव्यास ............. १७४
२९. भाऊ तारे कसे बनले ? ......... १७७
३०. तारूण्याचा देश ............... १७९

# जादूचा अंगरखा आणि सोनेरी पीस


**इंग्लंडमधील लोककथा**

इंग्लंडमध्ये एक तरुण शिकारी होता. त्याचा छंद तोच व्यवसाय होता. तो शूर होता. शिकार करताना वन्य पशू कधीकधी हल्ला करीत; पण त्या हल्ल्याला तोंड देऊन जंगलात भटकणे त्याला आवडायचे. असाच तो एकदा जंगलात चालला होता जवळ भाला, बरची, धनुष्यबाण अशी हत्यारे होती. तो मजेत शीळ घालत, आनंदात चालला होता.

तेवढ्यात समोरून एक म्हातारी काठी टेकत आली. ती त्याला म्हणाली, ''शूर तरुणा, माझ्यावर दया करतोस का ? मला खूप भूक लागली आहे. तुझ्याजवळ काही असेल तर मला देशील का ? मी मरते आहे भुकेने !''

शिकारी हॅन्स स्वभावाने दयाळू होता. त्याला म्हातारीची दशा बघवली नाही. त्याच्याजवळ ब्रेड होता. तो त्याने म्हातारीला दिला. ती म्हणाली, ''तू फार चांगला आहेस म्हणून तुझ्याकडे चांगल्या वस्तू असायला पाहिजेत. म्हणून मी सांगते ते ऐक. इथून असाच चालत राहा. वाटेत एक मोठे झाड लागेल. त्यावर बरेच पक्षी खूप कलकलाट करून भांडताहेत. त्यांचे भांडण चालले आहे एका अंगरख्यासाठी. तो अंगरखा तसाच मौल्यवान आहे. तो अंगावर चढवला की मनात येईल तिथे क्षणात जाता येईल, तर तू त्यातल्या मधल्या पक्ष्याला बाण मार. तो खाली पडेल, बाकीचे पक्षी उडून जातील. खाली पडलेल्या पक्ष्याच्या तुऱ्यातील मोठे सोनेरी पीस काढून घे. त्या पिसाचा गुण असा आहे की ते पीस ज्याच्याजवळ असते त्याला रोज सकाळी सोन्याचा तुकडा मिळतो आणि तो अंगरखाही तुझ्याजवळ ठेव. त्याचा तुला उपयोग होईल.''

हॅन्स पुढे गेल्यावर एका अंगरख्यासाठी झाडावर पक्षी भांडताहेत असे दिसले. चोचीने तो अंगरखा खेचण्याचा प्रयत्न करताहेत असे त्याने पाहिले. म्हातारीने सांगितल्याप्रमाणे त्याने मधल्या पक्ष्याला बाण मारला. तो तुरेवाला पक्षी खाली पडला. बाकीचे पक्षी उडून गेले. तो अंगरखाही खाली पडला. त्याने अंगरखा उचलला आणि मरून पडलेल्या पक्ष्याच्या तुऱ्यातील



सर्वात मोठे सोनेरी पीस काढून घेतले.

दुसऱ्या दिवशी खरेच त्याला सोन्याचा तुकडा मिळाला. म्हातारीने खरेच सांगितले होते. त्याने ते पीस त्याच्या अंगरख्याच्या आतून दंडाला बांधून टाकले. त्याला आता रोज सोने मिळू लागले. पुढे बरेच अंतर चालल्यावर समोर एक मोठा किल्ला दिसला. त्या किल्ल्याच्या खिडकीत एक म्हातारी उभी होती. ती होती एक चेटकीण, तिच्याबरोबर तिची सुंदर मुलगी उभी होती.

चेटकीण मुलीला म्हणाली, ''हा तरुण येतो आहे, त्याच्याजवळ दोन अलौकिक जादूच्या गोष्टी आहेत. त्या आपल्याकडे हव्यातच. त्या तू मिळवायच्या आहेस. त्याच्याशी गोड बोलून, वागून त्याचा विश्वास मिळव आणि काही करून त्या दोन गोष्टी त्याला फसवून मिळव. तू जर अशी वागली नाहीस तर माझ्याशी गाठ आहे. ध्यानात ठेव !.''

ती मुलगी – कारेन – स्वभावाने चांगली होती. आईसारखी कावेबाज नव्हती. तिने मुकाट्याने मान हलवली.

हॅन्स तिथे किल्ल्यात शिरला. त्याला तिथे रात्रीचा आसरा हवा होता. ''मला रात्री इथे राहायला जागा आणि जेवण मिळेल का ? मी भरपूर पैसे देईन. केव्हाचा चालतो आहे पण एकही घर दिसले नाही.''

म्हाताऱ्या चेटकिणीने अगदी गोड आवाज काढून त्याला आत बोलावले. ''जरूर !जागा आणि जेवण मिळेल. तू वाटेल तितके दिवस इथे राहा. नाहीतरी इथे दुसरा माणूस दृष्टीसही पडत नाही. आम्हालाही तुझी सोबत होईल.'' हॅन्स म्हातारीच्या गोड वागण्याला फसला. मग म्हातारीने कारेनलाच त्याला खोली दाखवायला आणि त्याच्या जेवणाची व्यवस्था करायला मुद्दामच सांगितले.

तिचे अप्रतिम सौंदर्य बघून हॅन्स भाळलाच होता. तिने त्याला खोली दाखवली आणि उत्कृष्ट असे जेवण दिले. तिचे गोड वागणे, गोड बोलणे हॅन्सला फार आवडले. त्यांची मैत्री वाढू लागली. तासन्तास दोघे बोलत असत. हसत-खेळत वेळ घालवीत असत. खरे तर कारेनलाही हा तरुण फार आवडला होता. त्याला फसवावे असे तिला अजिबात वाटत नव्हते; पण आईने पुन्हा एकदा तिला जरब दाखवली. ''लवकर मिळव आपल्याला हवे ते. नाहीतर तुला मी मारून टाकीन.''

तिचाही नाइलाज झाला. एके दिवशी तिने सरबताच्या पेल्यातून त्याला गुंगीचे औषध दिले.

हॅन्सने सरबत पिताच त्याला अनिवार गुंगी आली. त्याच्याजवळचे दंडला बांधलेले पीस तिने काढून घेतले तो जागा झाल्यावर अचानक अशी गुंगी का आली त्याला कळत नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला सोने मिळाले नाही म्हणून तो बघतो तर पीस नाहीसे झालेले होते. त्याला समजले, कारेननेच ते पीस घेतले आहे; पण त्याला त्याचे काहीच वाटले नाही. सोने आपल्याला मिळाले काय, तिला मिळाले काय, काय फरक पडतो ? शिवाय सोन्यापेक्षाही त्याला तिचे सुख, आनंद महत्त्वाचा आहे असे वाटले.

चेटकिणीला आनंद झाला. तिने मुलीला परत अंगरखा मिळवण्याची आठवण करून दिली. कारेन म्हणाली, ''जाऊ दे ना अंगरखा ! राहीना त्याच्याजवळ ! पीस मिळाले ना आपल्याला ! सोने मिळते आहे आपल्याला. त्याला परत एकदा फसवणे मला आवडणार नाही.''

मग म्हातारी फारच रागावली. मुलीला तिने एक थप्पड मारली, ''ही नुसती झलक आहे. माझे ऐकले नाहीस तर काय होईल तूही विचार कर ! तो अंगरखा मला हवाच !''

शेवटी कारेनला आईच्या मनासारखे वागावेच लागले. एक दिवस ती किल्ल्यातल्या खिडकीत उदास मुद्रेने उभी होती. तिला उदास बघून हॅन्सला वाईट वाटले. त्याने तिला खिन्नतेचे कारण विचारले. ती म्हणाली, ''खूप दूरवर बघ एक डोंगर दिसतो आहे, तो आहे पाचूंचा डोंगर. तिथे पाचूची लहानमोठी रत्ने खूप सापडतात, असे मी ऐकले आहे. मला पाचूचे दागिने घालायला खूप आवडतील. त्या पाचूच्या डोंगरावर मला जायचे आहे; पण ते कसे जमणार ? कारण तो किती दूर आहे बघतो आहेस ना ?''



हॅन्स म्हणाला, ''एवढेच ना ? त्यात काय अवघड आहे ? चल मी तुला आत्ता घेऊन जातो.''

त्याने अंगरखा चढवून तिचा हात धरला आणि क्षणात ते दोघे डोंगरावर पोहोचले. तिथे तिने खूप पाचूची रत्ने गोळा केली. मग ती त्याला म्हणाली, ''डोंगराच्या वर आणखीही खूप पाचू आहेत. मला ते हवे आहेत पण मी आता इतकी दमले आहे ! एक पाऊल पुढे टाकवत नाही. मी बसते आता इथेच !''

तो हसला आणि म्हणाला, ''मी तुला हवी तितकी रत्ने आणून देईन. तू इथेच थांब.'' असे म्हणून तो आणखी उंचावर गेला. त्याबरोबर तिने अंगरखा चढवला आणि क्षणात ती किल्ल्यात पोहोचली.

आपल्याला फसवले गेल्याचे हॅन्सच्या लक्षात आले; पण आता खेद करून काय उपयोग होता ? त्याच्या दोन्ही मूल्यवान वस्तू लुबाडल्या गेल्या होत्या.

तो भणंग भिकाऱ्यासारखा डोंगरावर भटकत राहिला. 'किती विश्वास ठेवला आपण तिच्यावर पण तिने फसवून विश्वासघात केला.' मनातून तो फार कष्टी झाला होता. तेवढ्यात त्याला खूप मोठ्या आवाजातले बोलणे ऐकू आले म्हणून तो झोपेचं सोंग घेऊन पडून राहिला. तीन प्रचंड राक्षस तिथे आले.

एकजण म्हणाला, ''अरे, हे काय गांडुळासारखे इथे पडलेले आहे ?''

दुसरा त्याला बुटानेच उलटे पालटे करतो. ''अरे माणूस आहे. टाकू का चिरडून ?'

तिसरा म्हणतो, ''कशाला त्रास घेतोस ? हा शिखरावर गेला की ढगच त्याला आकाशातून घेऊन जातील मग खाली पडून आपोआप मरेलच तो !'' तिघेजण निघून गेले. हॅन्स जागाच असल्यामुळे त्याने सगळे बोलणे ऐकले होते. तो हिमतीने डोंगराच्या शिखरावर गेला. 'एवीतेवी इथे अन्नपाण्यावाचून मरायचेच ते आकाशातून पडून मरावे.' शिखरावर पोहोचल्यावर खरोखरच त्याला ढगांनी आकाशात नेले. ढगाबरोबर तो पुढे पुढे जात राहिला; पण एके ठिकाणी पावसाबरोबर तो दणकन् खाली पडला; पण पडला ते ठिकाण म्हणजे भाजीपाल्याचा मोठा वाफा होता त्यामुळे त्याला फारसे लागले नाही.

तो असतो कोबीचा वाफा. पानापानातून कोबीचे गड्डे जमिनीलगत दिसत होते. त्याला खूप भूक लागली होती. म्हणून त्याने एक कोबीचा गड्डा काढून घेतला. थोडा खाऊन बघितला. बरा लागला. खरे तर कोबी हा काही पोटभरीचा पदार्थ नाही. त्याची कोशिंबीर किंवा भाजी करतात, हे त्याला माहीत होते.



कोबी कच्चाच खायला त्याने सुरुवात केली आणि काय नवल ! पाहता पाहता त्याला चार पाय फुटले, डोक्यावर कान उभे राहिले, शेपूट उगवली. ''हे काय झाले ?'' असे त्याने बोलायचा प्रयत्न केला; पण तोंडातून ''हाँ आँऽऽ हाँ आँऽऽ'' असे ओरडणे बाहेर पडले. तो चक्क गाढव झाला. ते लक्षात आल्यावर त्याला काहीच सुचेना. फारच वाईट वाटले

दुर्दशेचे ! पण अजून भूक होती, शिवाय तो आता गाढव होता त्यामुळे गाढवांचे आवडते खाद्य कोबी त्याने आणखी खायला सुरुवात केली. यावेळी त्याने पलीकडच्या वाफ्यातला लाल कोबी खाल्ला आणि मग आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो परत माणूस झाला.

त्याने थोडा विचार केला आणि भराभरा पांढरा वाईट कोबी आणि लाल चांगला कोबी असे दोन्ही प्रकारचे गड्डे त्याने काढून बरोबर घेतले.

मग चेहऱ्याला काळा रंग फासला, मिशा चिकटवल्या. खेडवळ शेतकऱ्याचे सोंग घेतले आणि तो भाज्या घेऊन किल्ल्यापाशी आला. त्याने दार ठोठावले. चेटकिणीने त्याला आत घेतले, ''कोण रे तू ? आणि इथे कशाला आला आहेस ?''

''बाईसाहेब मी एक शेतकरी, उत्तम भाजीपाला पिकवतो. राजाचा निरोप होता म्हणून निवडक उत्तम ताजी भाजी बरोबर घेतली आणि निघालो; पण रात्र पडेपर्यंत मी काही राजधानीत पोहोचणार नाही. मग एवढी ताजी भाजी शिळी होऊन जाईल. आता उद्या पहाटेच पुन्हा नवी भाजी तोडून लवकर निघेन; पण आता या भाजीचे काय करू ? इथे कुठे वस्ती पण नाही. नुकसानच होणार माझे !''

चेटकिणीने त्याला अजिबात ओळखले नव्हते. तिने विचारले, ''मला देतोस का तुझी भाजी?'' त्याने पांढऱ्या कोबीचा गड्डा काढला. तो ताजा करकरीत कोबी पाहिल्यावर तिला तो खावासाच वाटला. तिने तो ताब्यात घेतला आणि ती आत गेली. लगेच तिने तो चिरला. त्यात मीठ, मिरपूड, सेलरी घातली. त्याची कोशिंबीर बनवली. तिला ती कोशिंबीर खाऊन बघावीशी वाटली म्हणून भराभर दोन चमचे तिने तोंडात टाकले आणि त्याचा परिणाम लगेच झाला. ती गाढव बनली. खिंकाळत ते गाढव मागच्या आवारात पळाले. मग त्यांची मोलकरीण आली. बाऊल उचलताना रोजच्या सवयीप्रमाणे तिनेही कोशिंबिरीचे दोन चमचे तोंडात टाकले; ती पण गाढव झाली आणि मागच्या आवारात होऽ ओ ऽ असे ओरडत गेली.


कोशिंबीर अजून का कुणी आणीत नाही म्हणून वाट बघत असलेली कारेन स्वत: स्वयंपाकघरात आली. ते बाऊल पाहून तिला ती कोशिंबीर खावीशी वाटली. पटकन तिने दोन–तीन चमचे तोंडात घातले. परिणाम व्हायचा तोच झाला. ती पण गाढव झाली आणि मागच्या आवारात पळाली. तो पण मागोमाग गेला आणि म्हणाला, ''तू केलेल्या विश्वासघाताबद्दल तुला योग्य तेच बक्षीस मिळाले.''

मग त्याने लगेच तोंड धुऊन काळा रंग स्वच्छ केला. चिकटवलेल्या मिशा काढल्या. पुन्हा तो हॅन्स झाला. तो त्या तीन गाढवांना हाकलत एका कुंभाराकडे घेऊन गेला. कुंभाराला त्याने सांगितले. ''या तीन गाढवांना तू सांभाळायचे आहेस. मी त्याबद्दल तुला भरपूर पैसे देईन मात्र मी सांगतो तसे तू वागले पाहिजेस. हे जे म्हातारे गाढव आहे त्याला रोज एक वेळा खायला द्यायचे

आणि तीन वेळा ठोक द्यायचा, हे दुसरे मध्यम वयाचे गाढव आहे, त्याला एक वेळ ठोकायचे आणि तीन वेळा खायला द्यायचे आणि तिसरे तरुण गाढव आहे त्याला ठोकायचे नाही, आणि तीन वेळा खायला द्यायचे.''

कुंभाराने ते कबूल केले. काही दिवसांनी तो कुंभार किल्ल्यात हॅन्स राहायला गेला होता तिथे आला आणि त्याने ते म्हातारे गाढव मेल्याचे सांगितले. मधल्या वयाचे गाढव आजारी आहे आणि त्या तरुण गाढवाने खाणे–पिणे सोडल्यामुळे तेही लवकरच मरेल.

हॅन्स म्हणाला, ''नाही. असे होता कामा नये. चला. मी येतोच.'' त्याने तो कोबी चिरून सुकवून ठेवला होता तो घेऊन तो कुंभाराकडे गेला. त्याने तो चांगला कोबी दोन्ही गाढवांना खायला दिला. त्याबरोबर त्यांना मनुष्यरूप मिळाले, कारेन तर त्याच्या पायांवरच कोसळली. दोघींनी त्याची पुन्हा पुन्हा क्षमा मागितली. कारेनने हे सगळे आईच्या सांगण्यावरून केल्याचे त्याला सांगितले. मोलकरणीनेही तिची आई किती दुष्ट होती ते सांगितले आणि ''आईने हे काम करून घेण्यासाठी हिला किती मार दिला आहे ते मी पाहिले आहे. तिने तुमचा विश्वास तोडला असेल पण तिचे तुमच्यावर खूप प्रेम आहे.'' असे सांगितले.



मग हॅन्सचेही मन द्रवले. कारेनची त्याला कीव आली आणि त्याने तिला क्षमा करायचे ठरवले. कारण त्याचेही तिच्यावर खूप प्रेम होते. तिची आई तिच्याकडून धाक दाखवून वाईट कामे करवून घ्यायची हे त्याला आता समजले होते.

त्याने तिच्याशी लग्न करायचे ठरवले. त्यांचे लग्न झाले आणि दोघांचा संसार अतिशय सुखाचा झाला. पुढे कित्येक वर्षे त्या किल्ल्यात ते दोघे आणि त्यांची मुले आनंदात राहिली.



✦✦

# बटाट्या, कवठ्या आणि भोपळ्या

**इंग्लंडमधील लोककथा**

इंग्लंडमधील गोष्ट आहे. तो सैनिक युद्धावरून परत आला होता. खांद्यावर सामानाची पोतडी आणि हातात तलवार ! किती उमदा दिसत होता तो ! शूरही होता. डावे-उजवे पाऊल ठेक्यात टाकत गावाकडे निघाला होता. खरे तर घरी त्याची वाट बघणारे कुणीच नव्हते; पण तरी घरी परतण्याच्या ओढीने तो मजेत चालत होता.

एकदम त्याची वाट अडवली गेली, ''थांब रे पोरा, मी काय सांगते ते ऐक !'' एक अगदी जख्ख आणि हिडीस म्हातारी त्याच्या पुढ्यात आली. तिला बघून तो थांबला. ती होती एक चेटकीण ! अवतारच तसा दिसत होता. केसांचा कापूस, नाक मोठे वाकडे, तोंडात दोन सुळे तोंडाबाहेर आलेले, हातात वाकडी काठी !

''काय हवे आहे तुम्हाला ? मला का थांबवलेत ?''

''मला नको. तुलाच काही द्रव्य हवे का ? तू नेऊ शकशील इतके द्रव्य ! बोल, हवे आहे का?''

तो विचारात पडला. तो काही श्रीमंत नव्हता. द्रव्य कुणाला नको असते ? तरी त्याने विचारले, ''त्यासाठी तुम्हाला काय द्यावे लागेल? काही वेडेवाकडे करायचे असेल तर मला नको द्रव्य.''

''छे, वेडेवाकडे काही नाही, या उंच झाडावर चढून जा, झाड आतून पोकळ आहे, मी तुझ्या कमरेला दोरी बांधीन, तू त्या पोकळीतून खाली उतर. खाली मोठे दालन आहे आणि तिथे शंभरावर दिवे पेटलेले असल्यामुळे भरपूर उजेड आहे. तिथे तुला तीन खोल्या दिसतील. पहिली खोली उघड, कुलुपातच किल्ली आहे. तिथे एक मोठा पेटारा आहे. त्यावर एक मोठा कुत्रा बसलेला असेल; पण घाबरू नकोस, मी हा माझा काळा मोठा रुमाल देते, त्यावर त्या बटाट्याएवढे डोळे असलेल्या कुत्र्याला उचलून ठेव. पेटाऱ्यात तांब्याची नाणी भरलेली असतील ती तुला आणता येतील तेवढी आण. दुसऱ्या खोलीत कवठाएवढे डोळे असलेला मोठा कुत्रा पेटाऱ्यावर बसलेला असेल. तिसऱ्या खोलीत भोपळ्याएवढे डोळे असलेला दांडगा कुत्रा पेटाऱ्यावर बसलेला असेल;

पण माझ्या या काळ्या रुमालावर त्यांना ठेवलेस की ते काही करणार नाहीत. त्या दोन्ही पेटाऱ्यांत जे असेल ते तू घे. मात्र कुत्रे परत पेटाऱ्यावर ठेवायला विसरू नकोस. तुझे काम झाले की कमरेची दोरी खेच म्हणजे मी तुला वर ओढून घेईन आणि हो, माझ्यासाठी एक लहानशी वस्तू तिथून आणायची आहे. एक लहान पेटी आहे त्यात चकमकीचे दगड आहेत. ती पेटी तिथून आण.''

''ती एवढी महत्त्वाची आहे का ? कारण चकमकीचे दगड कुठेही मिळतात !'' डेव्हिडने विचारले.

''नाही रे बाबा, ती माझ्या आजीची आठवण आहे. ती तिथे गेली असताना तिथे विसरून आली. ती पेटी मला आजीची आठवण म्हणून हवी आहे.'' म्हातारीने डोळ्यांत खोटे अश्रू आणून सांगितले.

मग कमरेला दोर बांधून त्याला खाली सोडले. खरेच तिथे मोठे दालन होते आणि त्यात खूप दिवे पेटलेले होते. डेव्हिड पहिल्या खोलीत गेला. पेटाऱ्यावर बटाट्याएवढे डोळे असलेला कुत्रा बसला होता. डेव्हिडला भीती वाटली; पण काळ्या रुमालावर उचलून ठेवताना कुत्र्याने काही केले नाही. पेटाऱ्यात तांब्याची नाणी होती. डेव्हिडने आपल्या पोतडीत नाणी भरून घेतली. मग दुसऱ्या खोलीत कवठ्या होता म्हणजे त्याचे डोळे कवठाएवढे मोठे होते. तो ज्या पेटाऱ्यावर होता त्यात चांदीची नाणी भरलेली होती. मग त्याने तांब्याची नाणी काढून चांदीची नाणी भरून घेतली. मग तिसऱ्या खोलीत गेला. तिथे भोपळ्या म्हणजे भोपळ्याएवढे डोळे असलेला एक भयंकर कुत्रा बसलेला होता.

त्याने बिचकतच त्याला उचलून काळ्या रुमालावर ठेवले पेटारा उघडला, आणि सोन्याची नाणी काठोकाठ भरलेली बघून त्याचे डोळे चमकले. त्याने चांदीची नाणी काढून पोतडीत, खिशातून, टोपीतून गच्च सोन्याची नाणी भरून घेतली. खूपच जड होती नाणी; पण आता तो खूपच श्रीमंत झाला होता. गाडी, घोडे, वाडा, नोकर चाकर सगळे ठेवून आयुष्य आनंदात काढता आले असते. मग त्याने दोरी खेचली, वरून म्हातारीने विचारले, ''माझी चकमकीच्या दगडांची पेटी घेतलीस का ?''

तो विसरलाच होता. त्याने ती पेटी घेतली, म्हातारीने त्याला वर ओढून घेतले.

''आधी ती पेटी आण माझी इकडे.'' त्याला म्हातारीच्या घाईचे आश्चर्यच वाटले.

''देतो देतो, इतकी घाई कशाला ? मी ती कमरेच्या बेल्टमध्ये ठेवली आहे पडू नये म्हणून. ती काढायला तर हवी.''

मग म्हातारीने त्याचा बेल्ट हिसकला पण पेटी काढता आली नाही. मग म्हातारी खवळली. ''दे माझी पेटी नाहीतर मी तुला डुक्कर करीन, जाळून टाकीन. फसवतोस काय मला ?'' म्हातारीने तिच्या वाकड्या काठीने त्याला झोडपायला सुरुवात केली.

त्याने मार चुकवत विचारले, ''एवढे काय आहे त्यात ते मला सांग म्हणजे मी देतो पेटी.''

''तुला काय करायचे आहे ? तुला हवे तेवढे द्रव्य मिळाले ना ? मग माझी पेटी का देत नाहीस?'' पुन्हा तिने मारायला सुरुवात केली. तो मार चुकवायला त्याने तलवार आडवी घातली. तलवारीने तो मार चुकवत राहिला; पण मनाशी नवल करीत राहिला,